
शनिवार दि. ८ डिसेंबर २०१८

७

दै. सागर रायगड आवृत्ती

# रोहा कृषि विज्ञान केंद्राला उत्कृष्ट सादरीकरणाचा पुरस्कार



**रोहे** :- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान (एन.एफ.एस.एम.) या केंद्र सरकारच्या उपक्रमातंर्गत समूह प्रथमपंक्ती गळीतधान्य व कडधान्य व कडधान्य पीक प्रात्यक्षिक कार्यक्रम कृषि विज्ञान केंद्र, रोहा मार्फत रायगड जिल्ह्यात रब्बी-उन्हाळी २०१७-१८ व खरीप २०१८ मध्ये प्रभावीपणे शेतकऱ्यांच्या शेतावर राबविण्यात आला. त्यामध्ये प्रामुख्याने भुईमूगाच्या कोकण टपोरा व कोकण भूरत्न या वाणाचे तसेच बीज प्रक्रिया एकात्मिक अन्नधान्य व्यवस्थापन आदि तंत्रज्ञानावर आधारित प्रात्यक्षिके दिविल, पोलादपूर, आकले, महाड, निळज, धराणची वाडी इ. गावात डॉ. प्रमोद मांडवकर, कृषि विस्तार तज्ज्ञ यांच्या माध्यमातून व डॉ. मनोज तलाठी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. महाराष्ट्र राज्यातील एकूण ४५ कृषि विज्ञान केंद्रांनी सहभाग घेऊन आपल्या कार्याचे सादरीकरण केले. त्यामध्ये कृषि विज्ञान केंद्र रोहा रायगड केंद्रात उत्कृष्ट सादरीकरणाचा पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

सदर पुरस्कार डॉ. व्ही. पी. चहेल, ए.डी. जी. (कृषि विस्तार) भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली, भारत सरकार, निर्देशक, डॉ.लखनसिंग, कृषि उपयोजन संशोधन संस्था (अटारी),पुणे डॉ. संजय भावे संचालक विस्तार, डॉ. बा.सा.को.कृ.विद्या. दापोली यांच्या प्रमुख उपस्थितीत व डॉ.डी.एम.मानकर संचालक विस्तार शिक्षक पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.